| MHSO070000952024 | <u>नियमित दिवाणी दावा क्र.७७/२०२४ मधील निशाणी क्र.५६ वरील आदेश</u><br><u>(पारीत दिनांक ०१ जानेवारी २०२६)</u> |
|---|---|

१. प्रतिवादी क्र. ३ याने सदरचा अर्ज हा प्रतिवादी क्र. २ यांचा लेखी खुलासा व वादीच्या रजेबाबत आणि राजीनामाबाबत वादीने प्रतिवादी क्र. २ यांच्याकडे सादर केलेले कागदपत्रे अभिलेखावर सादर करण्यासाठी दाखल केलेला आहे. वादी व प्रतिवादी क्र. २ यांनी सदर अर्जावर म्हणणे सादर करुन प्रस्तुत अर्जास हरकत घेतली आहे. दोन्ही पक्षकारांचा युक्तीवाद ऐकला. अभिलेखाचे अवलोकन केले.

२. प्रतिवादी क्र. ३ याचे थोडक्यात असे कथन आहे की वादीने प्रस्तुतचा दावा हा प्रतिवादीं विरुध्द प्रतिवादी क्र.१ व २ यांनी दिनांक ०१.०५.२०१६ रोजी त्याची केलेली तोंडी सेवामुक्ती ही रद्दबातल व बेकायदेशिर आहे तसेच प्रतिवादी क्र.३ यांची केलेली नियुक्ती ही देखील रद्दबातल व बेकायदेशिर आहे असा ठराव होऊन मिळण्यासाठी व त्याचा थकीत पगार व इतर लाभ मिळण्यासाठी दाखल केलेला आहे. दावा दाखल केल्यावर वादीने तो प्रतिवादी क्र.१ कडे करत असलेल्या नोकरीबाबत एकतर्फा आदेश मिळवुन स्वतःची नोकरी सुरक्षित केली आहे. परंतु, वादी हा प्रतिवादी क्र.१ कडे रुजु असताना तो जिल्हा परीषद प्राथमिक शाळा, धानोरे केंद्र बोंडले, ता.माळशिरस येथे पवित्र प्रणाली अंतर्गत इयत्ता सहावी ते आठवी पदविधर शिक्षक पदावर दिनांक ०९.०७.२०२४ पासुन हजर व रुजु झाला. याचाच अर्थ, न्यायालयाच्या आदेशाने वादी हा प्रतिवादी क्र.१ कडे सेवेत रुजु असताना देखील तो इतर ठिकाणी हजर राहुन सेवा बजावत होता. म्हणजेच, एक व्यक्ती दोन ठिकाणी नोकरी करीत होता त्यामुळे वादी हा दिनांक ०९.०७.२०२४ व त्यानंतर किती दिवस प्रतिवादी क्र.१ संस्थेकडे कार्यरत होता किंवा नसेल तर दिनांक ०९.०७.२०२४ रोजी वादी हा दुस–या ठिकाणी नोकरीस रुजु झाल्यानंतर प्रतिवादी क्र.१ या संस्थेकडे त्याने राजीनाम्याचा अर्ज दिला होता किंवा कसे याबाबत प्रतिवादी क्र.२ यांचेकडून लेखी

खुलासा आणि संबंधित कागदपत्रे वादीने मागणी केली आहे. निशाणी क्र.५ वरील अर्जाच्या युक्तीवादापुर्वी सादर कागदपत्रे अभिलेखावर येणे गरजेचे आहे असे वादीचे कथन आहे. सबब, सदरचा लेखी खुलासा व कागदपत्रे दाखल करण्याचे आदेश प्रतिवादी क्र.२ यांना करावे अशी विनंती वादीने या अर्जाद्वारे केली आहे.

३. वादीने प्रतिवादीचा हा अर्ज कायदेशिर नसुन कोणतीही नोटीस प्रतिज्ञापत्राशिवाय असा अर्ज प्रतिवादीला देता येणार नाही असे कथन केले आहे. प्रतिवादीने स्वतःची बाजु स्वतःच्या बळावर सिध्द् करायची आहे. त्यासाठी न्यायालयीन यंत्रणेचा वापर करुन पुरावा गोळा करता येणार नाही. तसेच ज्या कागदपत्रांबाबत प्रतिवादीच्या कैफियतमध्ये कोणतेही कथन केले नसेल ती कागदपत्रे प्रतिवादीला मागता येणार नाहीत. सबब, प्रतिवादीचा अर्ज चुकीचा असुन तो नामंजुर करण्यात यावा असे वादीचे कथन आहे. प्रतिवादी क्र.२ याने योग्य ते आदेश पारीत करण्याची विनंती केली आहे.

४. वर नमुद केल्याप्रमाणे वादी यांनी वादी हे प्रतिवादी क्र.१ या संस्थेत सह शिक्षक पदावर नियुक्त झाले होते. परंतु, दिनांक ०१.०५.२०१६ रोजी वादीला कामावर येऊ नको असे तोंडी कळविण्यात आले व त्याला सेवामुक्त करण्यात आले. प्रतिवादी क्र.३ शिकवत असलेली विनाअनुदानित तुकडी बंद करण्यात आल्याने दिनांक २३.०१.२०१५ रोजी प्रतिवादी क्र.३ ला प्रतिवादी क्र.१ संस्थेने सेवामुक्त केले होते. तसेच तो विनाअनुदानित विभागात कार्यरत आहे असे दर्शवुन त्याला अनुदानित विभागामध्ये समाविष्ठ करण्याचा प्रस्ताव प्रतिवादी क्र.१ व २ यांनी दिला आणि दिनांक ०५.०५.२०१७ रोजी त्याला मान्यता मिळाली. वादीने याबाबत मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे याचिका दाखल केल्यावर त्या आदेशान्वये प्रस्तुतचा दावा दाखल केला असुन मा.उच्च न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे वादीची नोकरी संरक्षित करण्यात आली आहे. प्रतिवादी क्र.३ याने प्रस्तुत प्रकरणात निशाणी क्र.६२ वर कैफियत दाखल करुन वादीचा दावा फेटाळण्याची विनंती केली आहे. प्रस्तुतच्या अर्जाअन्वये प्रतिवादी क्र.३ चे कथन आहे की संबंधित कालावधीत वादी हा प्रतिवादी क्र.१ संस्थेकडे रुजु

असताना तो जिल्हा परीषद प्राथमिक शाळा, धानोरे केंद्र बोंडले, ता.माळशिरस येथे पवित्र प्रणाली अंतर्गत इयत्ता सहावी ते आठवी पदविधर शिक्षक पदावर दिनांक ०९.०७.२०२४ पासुन हजर व रुजु झाला. सबब, प्रतिवादी क्र.३ याने याबाबतची कागदपत्रे माहिती अधिकारात गोळा केली असुन ती न्यायालयात निशाणी क्र.५३ अन्वये दाखल केली आहेत. प्रतिवादी क्र.३ याला त्याची बाजु मांडण्यासाठी प्रतिवादी क्र.१ व २ यांचेकडील वादी संबंधातील कागदपत्रांची आवश्यकता असल्याने त्याने प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे.

**५.** प्रस्तुतचा दावा अद्यापी चौकशीपुर्व स्थितीमध्ये असुन पुराव्याचे कामकाज सुरु झालेले नाही. वादीने निशाणी क्र.५ अन्वये त्याला दाव्याचे कामकाज चालु असेपावेतो प्रतिवादी क्र.१ व २ यांनी पदमुक्त करु नये आणि सहशिक्षक म्हणुन काम करत असताना हरकत अडथळा करु नये असा मनाई आदेश मागितला आहे. परंतु, प्रतिवादी क्र.३ याचे याविपरीत कथन आहे. त्यासाठी त्याने प्रतिवादी क्र.१ व २ यांच्या अखत्यारीतील कागदपत्रांची मागणी केली आहे. वादीने सदरची मागणी दाव्याच्या या स्थितीमध्ये तसेच प्रतिवादीला मागणी करण्याचा हक्क नाही असा आक्षेप घेतला आहे. परंतु, उभयपक्षकारांना त्यांची बाजु मांडण्याची संपुर्ण संधी देणे आवश्यक आहे. वादीने तो प्रतिवादी क्र.१ संस्थेकडे कार्यरत असल्याचे व तेथील त्याची नियुक्ती ही संरक्षित करण्याची मागणी केली असुन त्याअन्वये प्रतिवादी क्र.३ याची नोकरी रद्दबातल करण्याची मागणी केली आहे. सबब, वादी व प्रतिवादी क्र.३ यांचे नोकरी विषयक हित परस्पर विरोधी आहे. वादीची नोकरी ही प्रतिवादी क्र.१ या संस्थेकडे असल्याने त्यासंबंधीची कागदपत्रे प्रतिवादी क्र.३ यांना प्रतिवादी क्र.१ व २ यांचेकडूनच प्राप्त होऊ शकतात. प्रतिवादी क्र.१ व २ या दाव्यामध्ये पक्षकार असल्याकारणाने त्यांच्याकडून कागदपत्रांची मागणी करणे बेकायदेशिर नाही. विरुध्द पक्षकाराकडून कागदपत्रांची मागणी करणे ही बाब न्यायलयीन प्रक्रियेचा वापर करुन पुरावा गोळा करणे यामध्ये समाविष्ट होत नाही. सबब, प्रतिवादी क्र.३ हा प्रतिवादी क्र.१ संस्था व त्याचे प्राचार्य प्रतिवादी क्र.२ यांचेकडून या कागदपत्रांची मागणी करु शकतो. तसेच प्रतिवादी क्र.३ याने मागणी केलेली कागदपत्रे प्रस्तुत वादविषयाशी संबंधित असल्याकारणाने

त्याचा अर्ज योग्य आहे. वरील कारणमिमांसेच्या आधारे पुढील प्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

**आ दे श**

१. अर्ज (निशाणी क्र. ५६) मंजुर करण्यात येत आहे.

२. प्रतिवादी क्र.१ व २ यांनी प्रतिवादी क्र.३ याने अर्जामध्ये मागणी केलेल्या कालावधीतील वादीशी संबंधित कागदपत्रे तसेच त्याबाबतचा लेखी खुलासा या प्रकरणात पुढील तारखेपर्यंत सादर करावा.

३. खर्चाबाबत कोणतेही आदेश नाही.

SONALI SHASHIKANT RAUL

Digitally signed by SONALI SHASHIKANT RAUL
Date: 2026.01.02 16:53:38 +0530

**(एस.एस.राऊळ)**

**दिनांक – ०१.०१.२०२६.**		**सह दिवाणी न्यायाधिश क.स्तर, पंढरपूर,**
**जि. सोलापूर.**

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment/ Order are same word to word as per the original order.

| | | |
|---|---|---|
| Name of Steno. | :- | D.S.Landage, Stenographer (Grade-III) |
| Court Name | :- | Jt. Civil Judge (Jr.Dn.) Pandharpur. |
| Date | :- | 01.01.2026. |
| Order signed by the presiding officer on | :- | 01.01.2026. |
| Order uploaded on | :- | 02.01.2026. |